"प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान" राबविण्याबाबत विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल/ सुधारणा करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१५/प्र.क्र.१२२/अभियान-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ जानेवारी, २०१७.

वाचा : १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.कौविउ-२०१५/ प्र.क्र.१९५/रोस्वरो-१, दिनांक ०३/०८/२०१५.

२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/रोस्वरो-१, दिनांक ०२/०९/२०१५.

**प्रस्तावना**

राज्यातील मनुष्यबळाचे कौशल्य विकसीत करुन त्यांना मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्धतेद्वारे परिवार व समाजाचा एक उत्पादक सदस्य म्हणून सन्मानाने आपले भावी आयुष्य समर्थपणे घडविता यावे. तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे एकात्मिकरित्या नियोजन व अंमलबजावणीतून "मेक इन इंडिया" आणि "मेक इन महाराष्ट्र" यासारख्या संकल्पना साकार करुन आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण करता यावे, यासाठी कौशल्य विकासासंबंधी सर्व समावेशक अभियान राबविण्याचा शासनाचा मानस आहे.

मा.पंतप्रधान यांच्या "स्कील इंडिया" या संकल्पनेस अनुसरून महाराष्ट्र राज्याने "कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र" हे ध्येय (Vision) समोर ठेवले असून, राज्यातील युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी **"प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानास"** विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी विभागाच्या दिनांक ०३/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीची दुसरी बैठक मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०३/११/२०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. राज्यात प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यासाठी विभागाने दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या विहित मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या निकषांच्या धर्तीवर सुसंगत करुन अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्यामध्ये आवश्यक तो बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यामध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी विभागाच्या दिनांक ०३/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीची दुसरी बैठक मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०३/११/२०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत केंद्र शासनाच्या कौशल्य विकासाबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनानुसार प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानासंदर्भातील काही तरतूदी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या कार्यपद्धतीबाबत केंद्र शासनाने दिनांक १५/०७/२०१५ व दिनांक २०/०५/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सर्वसाधारण निकष निर्गमित केले आहेत. त्यानुसार विभागाने दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यासाठी विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना आवश्यकतेनुसार केंद्र शासनाच्या निकषांप्रमाणे सुसंगत करुन अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्यामध्ये खालील नमूद आवश्यक ते बदल करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद | शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार केलेली सुधारणा |
|---|---|---|
| १ | **परिशिष्ट-१, १.७ (अ) मधील परिच्छेद क्र.१.७.१**<br>ज्या प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असेल त्यांना प्रशिक्षणानंतर मूल्यमापनासाठी पात्र गृहीत धरण्यात येईल. | ज्या प्रशिक्षणार्थ्यांची प्रशिक्षण वर्गातील उपस्थिती %७५ किंवा त्यापेक्षा जास्त असेल त्यांना प्रशिक्षणानंतर मूल्यमापनासाठी पात्र धरण्यात येईल. |
| २ | **परिशिष्ट-१, १.८ मधील परिच्छेद क्र.१.८.१**<br>प्रशिक्षणांती प्रमाणित लाभार्थ्यांपैकी किमान ७५% लाभार्थ्यांना प्रमाणित झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. यापैकी किमान ५०% लाभार्थींना रोजगार उपलब्ध करणे अनिवार्य राहील. | प्रशिक्षणांती प्रमाणित लाभार्थ्यांपैकी किमान ७५% लाभार्थ्यांना प्रमाणित झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. यापैकी किमान ५०% लाभार्थींना रोजगार उपलब्ध करणे अनिवार्य राहील. तथापि, ॲग्रीकल्चर, ब्युटी ॲण्ड वेलनेस, बांधकाम, पर्यटन, काऊन्सिलिंग स्किल, आर्ट ज्वेलरी या क्षेत्रातील अभ्यासक्रमांसाठी सदर ५०% रोजगाराचे प्रमाण कमी करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना राहतील. |
| ३ | **परिशिष्ट-१, १.८ मधील परिच्छेद क्र.१.८.२**<br>लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन दिल्यास त्यांना रोजगारातून मिळणारे | लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन दिल्यास त्यांना रोजगारातून मिळणारे मासिक वेतन हे |

| अ. क्र. | विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद | शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार केलेली सुधारणा |
|---|---|---|
| | वेतन त्यांच्या प्रशिक्षणावर झालेल्या खर्चाच्या किमान ५०% तसेच, कायद्याने विहीत केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी नसेल व अशा रोजगाराचा कालावधी त्याच किंवा अन्य नियोक्त्याकडे मिळून किमान ६ महिने राहील. | अर्धकुशल कामगारांसाठी कायद्याने विहीत केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी नसेल व अशा रोजगाराचा कालावधी त्याच किंवा अन्य नियोक्त्याकडे मिळून किमान ६ महिने राहील. |
| ४ | **परिच्छेद क्र.८**<br>सदर उमेदवारांच्या कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रति लाभार्थी खर्चाचे निकष खालीलप्रमाणे राहतील.<br>१. नोंदणी, कलचाचणी व समुपदेशनासाठीचे दर यथावकाश निश्चित करण्यात येतील.<br>२. सॉफ्ट स्किल प्रशिक्षण हे जास्तीत जास्त १०० तासांचे राहील व यासाठी रु.२७.५० प्रती तास इतका दर अनुज्ञेय राहील.<br>३. हार्ड स्किल संबंधी संबंधित पाठ्यक्रमाचा प्रशिक्षण कालावधी विहित केल्याप्रमाणे राहील व यासाठी रु.३०.०० प्रति तास इतका दर अनुज्ञेय राहील.<br>४. प्रशिक्षणोत्तर मुल्यमापनाचे दर प्रति व्यक्ती रु.८०० याप्रमाणे राहील. | सदर उमेदवारांच्या कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रति लाभार्थी खर्चाचे निकष खालीलप्रमाणे राहतील.<br>१. केंद्र शासनाच्या दिनांक १५/०७/२०१५ व दिनांक २०/०५/२०१६ रोजीच्या अधिसूचनेमध्ये कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या क्षेत्र/ उपक्षेत्रनिहाय केलेल्या वर्गीकरणानुसार निश्चित केलेल्या Base Cost अन्वये प्रशिक्षण खर्चाच्या प्रतिपूर्तीचे दर दिनांक ०१/०४/२०१७ पासून अनुज्ञेय राहतील. तथापि, यामुळे होणाऱ्या अतिरिक्त आर्थिक भाराबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने आढावा घेऊन शक्ती प्रदत्त समितीच्या पुढील बैठकीमध्ये सादर करणे आवश्यक राहील .<br>२. प्रशिक्षणोत्तर मुल्यमापनाचे दर परिशिष्ट-१ मधील परिच्छेद क्र.१.१२.१ नुसार राहतील. तसेच केंद्र शासनाच्या दिनांक १५/०७/२०१५ व दिनांक २०/०५/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्रशिक्षणोत्तर मुल्यमापनासाठी प्रति उमेदवार अनुज्ञेय खर्चात बदल आवश्यक असल्यास त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी विभागास प्रस्ताव सादर करुन मान्यता घ्यावी. |
| ५ | **परिशिष्ट-१, १.११मधील परिच्छेद क्र.१.११.१.**<br>शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १.८ मध्ये नमूद बाबींच्या अधीन राहून प्रशिक्षण खर्चाची प्रतिपुर्ती खालील | शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १.८ मध्ये नमूद बाबींच्या अधीन राहून पुढील आर्थिक |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद</th><th>शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार केलेली सुधारणा</th></tr>
<tr><td></td><td>पध्दतीने करण्यात येईल -:<br>(अ) १०% रक्कम प्रशिक्षण सुरू झाल्यावर (अभ्यासक्रमाच्या पहिल्या दिवशीच्या बायोमेट्रीक हजेरी प्रणालीच्या आधारे)<br>(ब) खर्चाची ५०% रक्कम अभ्यासक्रम/ प्रशिक्षण संपल्यानंतर (Biometric हजेरी प्रणालीत उपस्थितीच्या आधारे व मुल्यमापन व प्रमाणीकरणाच्या आधारे), खर्चाची ३०% रक्कम, यशस्वी झालेल्या उमेदवारांपैकी किमान ७५% उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार मिळाल्यानंतर (नोकरी लागल्यापासून/ स्वयंरोजगार मिळून तीन महिन्यानंतर विहित कागदपत्रे/ पुरावे सादर केल्यावर)<br>(ड) उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार ६ महिन्यापर्यंत उपलब्ध झाल्याबाबतचे विहित कागदपत्रे/ पुरावे सादर केल्यावर आणि त्याचे मुल्यमापन फॉर्म ऑनलाईन प्राप्त झाल्यावर उर्वरित १० टक्के रक्कम अदा करण्यात येईल.</td><td>वर्षापासून (२०१७-१८) प्रशिक्षण खर्चाची प्रतिपुर्ती खालील पध्दतीने करण्यात येईल -:
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रशिक्षण खर्चाच्या प्रतिपूर्तीचे टप्पे</th><th>प्रतिपूर्तीचे टप्पे</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रशिक्षण सुरु झाल्यावर ७ दिवसांचे आंत (प्रशिक्षणार्थ्यांच्या पहिल्या आठवड्यातील महत्तम बायोमेट्रीक प्रणालीवरील उपस्थितीच्या आधारे)</td><td>३०%</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रशिक्षण संपल्यानंतर (मुल्यमापन व प्रमाणीकरणाअंती)</td><td>३०%</td></tr>
<tr><td>३</td><td>यशस्वी उमेदवारांपैकी किमान ७५% उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार प्राप्त झाल्यानंतर (नोकरी प्राप्त झाल्यापासून/ स्वयंरोजगार मिळून तीन महिन्यानंतर विहित कागदपत्रे/ पुरावे सादर करणे आवश्यक)</td><td>२०%</td></tr>
<tr><td>४</td><td>उमेदवारांना ६ महिन्यापर्यंत रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध झाल्याबाबत विहित कागदपत्रे / पुरावे सादर केल्यावर आणि त्याचे मुल्यमापन फॉर्म MSSDS यांना पोर्टलद्वारे प्राप्त झाल्यानंतर</td><td>२०%</td></tr>
</table>
उपरोक्त टप्प्यांमध्ये प्रशिक्षण खर्चाची प्रतिपूर्ती करतांना खालील अटींचे पालन करणे बंधनकारक राहील :-<br>१. केवळ प्रथमत: प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांकरीता वरीलप्रमाणे खर्चाची प्रतिपूर्ती लागू लागू राहील.<br>२. दुसऱ्या टप्प्यातील ३०% रक्कम यशस्वीरित्या प्रमाणित उमेदवारांकरीताच अनुज्ञेय राहील.<br>३. दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील रकमेकरीता गळती झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना विचारात</td></tr>
</table>

| अ. क्र. | विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद | शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार केलेली सुधारणा |
|---|---|---|
| | | घेतले जाणार नाही. परंतू दुसऱ्या टप्प्यातील रक्कम अदा करतेवेळी पहिल्या टप्प्यात गळती झालेल्या उमेदवारांकरीता अदा केलेल्या रक्कमेची वजावट करण्यात येईल.<br>४. तिसऱ्या टप्प्यातील रकमेकरिता यशस्वी उमेदवारापैकी कमीत कमी ७५% उमेदवारांना (ॲग्रीकल्चर, ब्युटी ॲण्ड वेलनेस, बांधकाम, पर्यटन, काऊन्सिलिंग स्किल, आर्ट ज्वेलरी या क्षेत्रातील प्रशिक्षण कार्यक्रमांव्यतिरिक्त इतर प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी उक्त ७५% उमेदवारांपैकी किमान ५०% उमेदवारांना रोजगार) परिक्षा प्रमाणपत्र मिळाल्याच्या दिवसापासून तीन महिन्यांच्या आंत रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. सदर अटीची पूर्तता केल्यानंतरच रक्कम अदा करण्यांत येईल.<br>५. चौथ्या टप्प्यामध्ये pro rata दराने रक्कम अदा करण्यांत यावी. चौथ्या टप्प्यातील रकमेकरीता तिसऱ्या टप्प्यात गळती झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना विचारात घेतले जाणार नाही. |
| ६ | **परिशिष्ट-१ मधील १.५**<br>१.५.१ व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र हे कौशल्यपूर्व चाचणी करण्याच्या दृष्टीने नोंदणी, मूल्यमापन, समुपदेशन व मार्गदर्शनासह खालील जबबादाऱ्या पार पाडण्याकरिता कार्यरत राहील.<br>I. लाभार्थ्यांचा नैसर्गिक कल व आवड तपासण्याकरिता कौशल्यपूर्व चाचणी घेणे.<br>II. लाभार्थी व रोजगार देणाऱ्या औद्योगिक समूहांचे प्रतिनिधी यांच्यातील संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे व | १.५.१ कौशल्य प्रशिक्षण संस्थांनी उमेदवारांचे परिचलन (Mobilization) करून कौशल्य प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यापूर्वी त्यांनी लाभार्थ्यांचा नैसर्गिक कल व आवड तपासण्याकरिता कौशल्यपूर्व चाचणी घेणे अपेक्षित आहे. प्रशिक्षण खर्चाच्या विहित प्रतिपूर्ती दरामध्ये Mobilization व कौशल्य पूर्व चाचणीच्या खर्चाचा समावेश राहील. |

| अ. क्र. | विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद | शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार केलेली सुधारणा |
|---|---|---|
| | मार्गदर्शन करणे.<br>III. प्रशिक्षित उमेदवारांना रोजगाराच्या विविध संधीची माहिती देऊन शिफारस करणे व रोजगार प्राप्त उमेदवारांचा पाठपुरावा करणे.<br>IV. लाभार्थ्यांना रोजगार प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने राज्यातील व राज्याबाहेरील औद्योगिक समुहांसमवेत समन्वय साधणे.<br>V. स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना मार्गदर्शन करणे.<br>VI. उपरोक्त बाबींव्यतिरिक्त विहित केलेल्या जबाबदाऱ्या.<br>१.५.२ सहाय्यक संचालक ,कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता हे क्षेत्रीय शिबिरांसाठी पुरेशी जागा व इतर पायाभूत सुविधा योग्य इमारत CGCC साठी निश्चित करतील. याचा वापर विद्यार्थ्यांची नोंदणी, मूल्यमापन, समुपदेशन व रोजगारासाठी सहाय्य करणाऱ्या CGCC च्या स्थापनेकरीता करण्यात येईल.<br>१.५.३ सहाय्यक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता किंवा जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती आवश्यकतेनुसार दुर्गम भागामध्ये योजनेबाबतची जनजागृती (Mobilization) व CGCC करिता तात्पुरत्या स्वरुपाच्या सुविधा उपलब्ध करुन देतील.<br>१.५.४ CGCC च्या कामाची सांगड कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्यांसोबत घालण्यात येईल. | |

| अ. क्र. | विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूद | शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार केलेली सुधारणा |
|---|---|---|
| | १.५.५ CGCC एजन्सी, सहाय्यक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांच्या सहकार्याने लाभार्थ्यांकरिता मुल्यांकन व समुपदेशनाचे नियोजित वेळापत्रक महाकौशल्य पोर्टलवर प्रसिद्ध करेल.<br><br>१.५.६ CGCC एजन्सीने प्रत्येक लाभार्थ्यांची नोंदणी "महाकौशल्य" व "महारोजगार" या पोर्टलवर करणे बंधनकारक राहील.<br><br>१.५.७ CGCC एजन्सी प्रत्येक लाभार्थ्यांच्या कौशल्यपूर्व चाचणी अहवालाची महाकौशल्य पोर्टलवर नोंद करेल व त्याची सांगड लाभार्थ्याच्या महारोजगार/ महास्वयंरोजगार पोर्टल वरील त्याच्या profile शी घालण्यात येईल.<br><br>१.५.८ CGCC एजन्सी मूल्यमापनाच्या आधारे भौगोलिक, तसेच सुचविलेल्या अधिक मागणीच्या क्षेत्रात लाभार्थी रोजगारास पात्र आहे किंवा त्यास ठराविक कालावधीचे Hard Skill/Soft Skill प्रशिक्षण देणे आवश्यक आहे याबाबतच्या माहितीचे वर्गीकरण करुन महाकौशल्य पोर्टलवर प्रसिद्ध करेल. | |
| ७ | **परिच्छेद क्रमांक ३.९**<br>महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेच्या https://mahakaushalaya.com या वेबपोर्टलवरून उमेदवारांच्या नोंदणीपासून मूल्यमापन, समुपदेशन, प्रशिक्षण व प्रशिणक्षोत्तर मूल्यमापन, प्रमाणीकरण आणि रोजगारपरांत अनेक बाबींचे सनियंत्रण होणार आहे . | राज्यात प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाची अंमलबजावणी व संनियंत्रण महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी वेळोवेळी प्राधिकृत केलेल्या वेबपोर्टलद्वारे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

उपरोक्त शासन निर्णय मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०३/११/२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०११३१२१६४१९४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S.G. Patil

Digitally signed by S.G. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SDED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f64f9296da4ba15d02d3ad3826a21a74ed080355ac04eef5617c3b4f08af47ae, cn=S.G. Patil
Date: 2017.01.13 12:24:52 +05'30'

(सं.गि.पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व संबंधित मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई,
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा.मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ परेड, मुंबई,
११. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय,वरळी,मुंबई,
१२. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१५. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. सर्व जिल्हाधिकारी ,
२०. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२२. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
२३. उपरोक्त समित्यामधील सर्व शासकीय सदस्य,
२४. उपरोक्त समित्यामधील सर्व अशासकीय सदस्य,
२५. संचालक (प्रशिक्षण ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२६. संचालक (शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई,
२७. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/ नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक,
२८. विभागीय सहसंचालक/उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई/पुणे/ नागपूर/ अमरावती/औरंगाबाद/नाशिक विभाग,
२९. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
३०. निवड नस्ती.